MHAH080011082019

**<u>नियमित दिवाणी दावा क्रमांक ५९३/२०१९ मधील नि. ६०</u>**
**<u>वरील आदेश</u>**
*<u>(शांताराम तात्याबा थोरात विरुद्ध साहेबराव रमाजी गवांदे व इतर)</u>*

*<u>(दिनांक २१/०७/२०२५ रोजी)</u>*

प्रतिवादी क्र. ५अ ते ५क यांनी प्रस्तूतचा अर्ज हा दाव्यास कैफियत दाखल करण्यास विलंब झाल्याने त्यांच्याविरुध्द झालेला विना कैफियत आदेश रद्द करुन मिळावा यासाठी दाखल केला आहे.

**०२.** प्रतिवादी क्र. ५अ ते ५क चे असे कथन आहे की, सदरचा दावा चालु असतांना प्रतिवादी क्र. ५ सुदाम हा मयत झाला असुन प्रतिवादी क्र. ५अ ते ५क हे त्यांचे कायदेशिर वारस आहेत. प्रतिवादी यांनी मुदतित दाव्याचे कामी कैफियत देणे गरजेचे होते परंतु, प्रतिवादी क्र. ५अ चे पती व ५ब ते ५क चे वडील मयत झाल्याने कुटुंबावर मोठा आघात झाल्याने त्यांना दुःखातुन सावरण्यासाठी बराच कालावधी गेला. तसेच, दावा मिळकतीच्या अनुषंगाने सर्व कागदपत्रे प्रतिवादी क्र. ५अ ते ५क यांना मुदतीत व वेळेत उपलब्ध झाली नाहीत. त्यामुळे प्रतिवादींना सदर दाव्यामध्ये कैफियत देता आली नाही. प्रतिवादी क्र. ५अ ते ५क यांनी जाणीवपुर्वक व हेतुपुरस्सर कैफियत देण्यास टाळाटाळ केलेली नाही. या दाव्याचा निकाल गुणदोषावर होणेकामी प्रतिवादी यांना नैसर्गिक न्याय मिळण्याचे दृष्टीने प्रतिवादींची कैफियत स्विकारण्यात यावी. तसेच, प्रतिवादींना त्यांची बाजु मे. कोर्टासमोर मांडण्याची सधी मिळावी अशी विनंती प्रतिवादी क्र. ५अ ते ५क यांनी केली आहे. सबब, प्रतिवादी क्र. ५अ ते ५क विरुध्द झालेला नो.डब्ल्यु.एस. चा हुकूम रद्द करुन प्रतिवादी क्र. ५अ ते ५क ची कैफियत स्विकारण्याचा आदेश व्हावा अशी विनंती केली.

**०३.** वादी यांनी सदर अर्जावर म्हणणे दाखल करुन असे कथन आहे की, प्रतिवादींवर दि. ०६/१२/२०२३ रोजी नोटीसची बजावणी झाली असुन १६ महिने उशिर अक्षम्य आहे. प्रतिवादी हा दि. ३१/०७/२०२२ रोजी मृत्यू पावला आहे. सबब, अर्जातील कारणे खोटी आहेत. तरी, प्रतिवादी यांचा अर्ज खर्चासह रद्द करण्यात यावा अशी विनंती

केली.

**०४.** वादी व प्रतिवादी यांच्या विधीज्ञांचा युक्तिवाद ऐकला. प्रतिवादी क्र. ५अ ते ५क यांनी विहीत मुदतीमध्ये कैफियत दाखल करणे आवश्यक होते. परंतु, प्रतिवादी क्र. ५अ चे पती व ५ब ते ५क चे वडील मयत झाल्याने कुटुंबावर मोठा आघात झाल्याने त्यांना दुःखातुन सावरण्यासाठी बराच कालावधी गेला. तसेच, प्रतिवादी क्र. ५अ ते ५क यांना दावा मिळकतींच्या अनुषंगाने सर्व कागदपत्रे मिळाण्यास उशिर झाल्याने त्यांना सदर दाव्यामध्ये कैफियत दाखल करणेस विलंब झाला असल्याचे कथन केले आहे. प्रतिवादी क्र. ५अ ते ५क चे म्हणणे ऐकणे व त्यांना संधी देणे न्यायाच्या दृष्टीने तसेच, सदर दावा गुणदोषावर निकाली होणेसाठी गरजेचे आहे. सबब, सदर अर्ज न्यायाच्या हितार्थ रक्कम रु. ३००/– वादीस देण्याच्या खर्चासह मंजूर करणे न्यायोचित ठरेल. सबब, खालील प्रमाणे आदेश करण्यात येतो

**आदेश**

१. अर्ज (**नि.६०**) हा खर्चासह मंजूर करण्यात येतो.

२. प्रतिवादी क्र. ५अ ते ५क यांनी वादीस रक्कम रु. ३००/– इतका खर्च देवुन त्यांच्या विरुध्द झालेला पुरावा बंदचा आदेश रद्द करणेत येतो.

SHUBHANGEE BALASAHEB DHAWALE

Digitally signed by SHUBHANGEE BALASAHEB DHAWALE
Date: 2025.07.22 11:04:22 +0530

**संगमनेर**.
दि. २१/०७/२०२५.

(श्रीमती एस. बी. ढवळे.)
सह दिवाणी न्यायाधीश, क.स्तर, **संगमनेर**.